## अल्पारंभ फाऊंडेशन मार्फत घेतलेले शैक्षणिक उपक्रम

- जुलै २०२६ : ४ जुलै रोजी नवरचना विद्यालयात 'कापरेकर गणित मंडळा'ची स्थापना नवरचना विद्यालयात करण्यात आली. गणिती दिनदर्शिका, १२ तासांचे घड्याळ वेगळ्या पद्धतीने तयार करणे इ. गणित सहाय्यक उपक्रम राबले जात आहेत.




- **जुलै २०२६ :** २२ जुलै हा 'पाय सन्निकटन दिवस' अर्थात **Pi Approximation Day !** हा गणितीय दिनविशेष अल्पारंभ फाऊंडेशनच्या माध्यमातून 'कापरेकर कॉर्नर' या उपक्रमा अंतर्गत विविध ठिकाणी साजरा करण्यात आला.



D

- **जुलै २०२६ :** तीन दिवसीय "श्री समर्थ कथा" हा प्रेरणादायी कार्यक्रम दिनांक १०, ११ व १२ जुलै २०२६ रोजी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, गंगापूर नाका, नाशिक येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या संपन्न झाला.




D

- **जुलै २०२६ :** कापरेकर यांच्या अद्वितीय गणितीय योगदानाची ओळख करून देणारे आकाशवाणी प्रसारण संपन्न झाले. प्रसारण कालावधी: ३ जुलै ते ७ जुलै २०२६ , लेखन व वाचन: डॉ. रुपाली कुलकर्णी.



H

- **मे २०२६** : ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांना कार्यातून श्रद्धांजली अर्पण करण्याचा सुंदर विचार पुढे आला आणि त्यातून "तेजोमय मेमरी क्लब" ची सुरुवात झाली.




- **मार्च २०२६ :** सोशल नेटवर्किंग फोरम (**SNF**) ही नाशिकस्थित स्वयंसेवी संस्था गेल्या ६ वर्षांपासून दुर्गम आदिवासी भागात 'ग्राम वाचनालय चळवळ' राबवत आहे. आजपर्यंत ३० वाचनालये कार्यरत आहेत आणि या वाचनालयांच्या माध्यमातून अभ्यास केलेल्या १०० हून अधिक ग्रामीण विद्यार्थ्यांनी शासकीय नोकऱ्या मिळवल्या आहेत. फाउंडेशनमार्फत **SNF** चे श्री. प्रमोद गायकवाड यांच्याकडे १० वाचनालयांसाठी पुस्तकांचे सेट देण्यात आले.



- **नोव्हेंबर २०२५:** सायबर सुरक्षा आणि आर्थिक नियोजन — जागरूकतेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल. अल्पारंभ फाउंडेन्शनच्या डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी **Sandfield Engg. Co. Pvt. Ltd.,** अंबड येथे “**Cyber Suraksha”** या विषयावर उपयुक्त सत्र घेतले. .






- **ऑक्टोबर २०२५:** युनिक ट्रीटमेंट्समध्ये **Cyber Suraksha!** डिजिटल सुरक्षिततेसंबंधित जागरूकता आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. डॉ. रुपाली कुलकर्णी यांनी युनिक ट्रीटमेंट्स या कंपनीमध्ये सायबर सुरक्षा

विषयावर जागरूकता सत्र घेतले. विविध सायबर  फ्रॉड्स  आणि ते टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी यासंबंधी विविध उदाहरणांसह तेथील टीमला माहिती देण्यात आली.





- **सप्टेंबर २०२५:** आमच्या शैक्षणिक उपक्रमांतर्गत 'सायबर सुरक्षा जागरूकता'  सत्र. डॉ. रुपाली  कुलकर्णी यांनी नुकतेच  रिषभ इन्स्ट्रुमेंट्स, **MIDC** सातपूर येथे त्यांच्या टीमसाठी सत्र घेतले, ज्यात या डिजिटल युगात वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे महत्त्वाचे पैलू मांडले.



- **ऑगस्ट २०२५:** अल्पारंभ फाउंडेशनद्वारे स्वातंत्र्यदिनानिमित्त, नाशिक येथील श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालयात विशेष विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधार देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला . 🎧✨येथील विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रे (**Hearing Aids**) देऊन त्यांच्या शिक्षणाला अधिक सुलभ आणि आत्मविश्वासपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



- **ऑगस्ट २०२५:** अल्पारंभ फाऊंडेशनच्या 'सायबर सुरक्षा' उपक्रमा अंतर्गत डॉ. रुपाली कुलकर्णी यांनी महाराष्ट्रभरातील **MERI** अंतर्गत कार्यरत अभियंत्यांसाठी सायबर सुरक्षा या विषयावर ऑनलाइन प्रशिक्षण सत्र घेतले. या ऑनलाईन सत्रात डिजिटल सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी व टाळावयाच्या चुका (**Dos & Don'ts)** यावर चर्चा झाली. प्रत्यक्ष जीवनातील सायबर धोके आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय यांची सविस्तर माहितीही देण्यात आली.


महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक

दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४.

प्रमाणपत्र

प्रतिः - डॉ. रुपाली दिपक कुलकर्णी,
SWS Financial Solutions Pvt. Ltd., Nashik

महोदया,

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक तर्फे दि. ०८/०८/२०२५ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या "सायबर सुरक्षा" या विषयीच्या **ऑनलाईन** प्रशिक्षणातील आपल्या व्याख्यानाव्दारे संपुर्ण महाराष्ट्रातून प्रशिक्षणास उपस्थित अधिका-यांना आपल्या ज्ञानाचा लाभ झालेला आहे व त्यांना या ज्ञानाचा उपयोग त्यांच्या दैंनंदिन कामात होणार आहे.

आपण घेतलेल्या मेहनतीबाबत व आपल्या व्याख्यानाबाबत प्रबोधिनी आपली आभारी आहे. तसेच यापुढेही आपले मार्गदर्शन असेच उपलब्ध राहील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

जा.क्र. मअप्रप्र/मेटा-ऑनलाईन/(०४-२५)/१३१/ Dt. ११/०८/२५

अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक ४२२ ००४

- **४ जुलै २०२५** भारतीय गणितज्ञ कै. दत्तात्रय रामचंद्र कापरेकर यांचा स्मरणदिन.या दिवसाचे औचित्य साधून, विद्या प्रबोधिनी प्रशाला-मराठी माध्यम, येथे 'गणिती उपक्रम' या विषयावर विद्यार्थ्यांबरोबर, अल्पारंभाच्या सदस्या डॉ. रुपाली कुलकर्णी यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची भीती दूर होऊन, गोडी निर्माण व्हावी यादृष्टीने वर्षभर कुठल्या विविध गणिती-उपक्रमांवर त्यांना काम करता येईल, हे त्यांनी समजावून सांगितले.




- **जून २०२५:** जे सतत इतरांची काळजी घेतात , त्यांच्यासाठी मानसिक आधार... ✿ "काळजी तुमच्याही मनाची" – एक दिवसीय मानसिक आरोग्य कार्यशाळा. अल्पारंभ फाऊंडेशन आयोजित या महत्वपूर्ण कार्यशाळेत मानसशास्त्रज्ञ सौ. साक्षी देशमुख (**Industrial Psychologist**) यांनी विविध संस्थांमधील विशेष विद्यार्थ्यांचे

पालक व काळजीवाहू अशा ३०+ सहभागी सदस्यांना 'मानसिक आरोग्य आणि काळजी ' या विषयावर मार्गदर्शन केले.



- **१ मार्च २०२५:** पर्यावरणासाठी प्लास्टिक प्रदूषणाविरुद्ध लढा देणाऱ्या 'खारीचा वाटा : कापडी पिशवी प्रकल्प' च्या लहान कार्यकर्त्यांनी आपल्या प्रकल्पाचे महत्व पथनाट्याद्वारे सांगितले. आजमितीस ४००० कापडी पिशव्यांचे वाटप त्यांनी केलेले आहे. त्यांच्या कामाची माहिती SWS Financial Solutions Pvt. Ltd, Nasik या संस्थेच्या तिसाव्या वर्धापनदिनानिमित्ताने उपस्थितांसमोर मांडली.



- **दि. २८ जाने. २०२५** रोजी 'कापरेकर कॉर्नर' या उपक्रमाची सुरुवात आर. एच. सपट अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक येथे करण्यात आली आहे. नाशिकचे गणितज्ञ कै. दत्तात्रय कापरेकर यांच्या अंकशस्त्रातील संशोधनाबद्दल जनजागृती करण्यासाठी आणि त्यांच्या गणिती संकल्पना आजच्या विद्यार्थी पिढीसमोर आणण्यासाठी अल्पारंभ फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रम सुरु असतात.




- **जानेवारी २०२५:** श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालय, नासिक, येथील विद्यार्थ्यांसाठी साई स्पोर्ट्स आणि अल्पारंभ फाऊंडेशनच्या माध्यमातून चेस बोर्डस चे वितरण करण्यात आले. खेळातून बुद्धी आणि विश्लेषणात्मक चातुर्य यांचा विकास व्हावा हा उद्देश्य !





- **ऑक्टोबर २०२४:** श्रवण आरोग्याची काळजी !! श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालय येथे ४ दिवसीय श्रवण मूल्यमापन शिबिर आयोजित करण्यात आले. विख्यात संस्था WeHear तर्फे विद्यार्थ्यांच्या श्रवण आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी ऑडिओग्रामसह सर्वसमावेशक श्रवण तपासणीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे त्यांच्या श्रवण क्षमतेत प्रगती होणे अपेक्षित आहे.

 

- **सप्टेंबर २०२४:** अल्पारंभ फाऊंडेशन  हे, प्लॅस्टिक पिशव्यांमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचा मुकाबला करण्यासाठी 'कापडी पिशवी प्रकल्प' यावर काम करत असलेल्या 'खारीचा वाटा' टीमसाठी फन्डिंग पार्टनर म्हणून काम करत आहे ! पहिल्या प्रयत्नात बाजारातून ५००० प्लास्टिक बॅग्स चे निर्मूलनासाठी काम केले जात आहे . शालेय विद्यार्यांच्या मदतीने या सामाजिक प्रश्नावर काम करतांना, कापडी पिशवीच्या वापरासाठी भाजी विक्रेते आणि ग्राहक यांचेही प्रबोधन केले जात आहे.

 

- **ऑगस्ट २०२४:** कर्णबधिर मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या श्रीमती माई लेले विद्यालयात ३ गरजू विद्यार्थ्यांना हियरिंग ऐड चे वाटप करण्यात आले.






- **ऑगस्ट २०२४:** समर्थ विद्यापीठ या संस्थेचे कार्य अनोखे आणि महत्वपूर्ण आहे. जिथे जिल्हा परिषदेच्या शाळा अजूनही पोहोचल्या नाहीत तिथे शाळा सुरु करून शिक्षणाचा प्रसार करण्याचे उदात्त कार्य संस्थेमार्फत सुरु आहे. अल्पारंभ फाऊंडेशन  तर्फे अशा शैक्षणिक उपक्रमांना नेहेमीचं प्रोत्साहन दिले जाते. या संस्थेचा प्रतिनिधी म्हणुन श्री. रघुवीर अधिकारी हे नुकतेच "समर्थ विद्यापीठ: आचार्य प्राथमिक अभ्यास वर्ग समापन समारोह" या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गावोगावी शिक्षणाचा यज्ञ चालविणाऱ्या उपस्थित शिक्षकांना त्यांनी मार्गदर्शन केले आणि अध्ययनातील काही क्लुप्त्या त्यांच्या बरोबर सामायिक केल्या.






- **जुलै २०२४**: भारताचे प्रसिद्ध गणितज्ञ  श्री.दत्तात्रय रामचंद्र कापरेकर यांच्या स्मृतिदिनाचे ( ४ जुलै) औचित्य साधून, अल्पारंभा फाउंडेशन, नाशिक तर्फे विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेकविध  कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.  सी.एच.एम ई. सोसायटीच्या विद्याप्रबोधिनी शाळेत  इयत्ता  सहावी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी, "कापरेकर स्पर्धा परिक्षा" या उपक्रमाचे आजोजन करण्यात होते. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची भीती कमी व्हावी व या विषयाची आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांची तार्किक व बौद्धिक क्षमता विकसित व्हावी या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.        ‘






- **जुलै २०२४**: जि. प. शाळा, किनिस्ते, तालुका मोखाडा, जि. पालघर येथे शालेय विद्यार्थ्यांना अल्पारंभ फाऊंडेशन मार्फत शालेय साहित्याच्या स्वरूपात मदत करता आली.





- **९ मार्च २०२४:** अल्पारंभने डॉ. मुंजे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर स्टडीजसोबत "करिअर क्राफ्ट: स्किल एन्हांसमेंट" हा सामंजस्य करार केला. या अंतर्गत व्यवस्थापन क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम आखले गेले आहेत. उद्घाटन सत्र, कु. साक्षी देशमुख यांनी घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसाठी "मुलाखत तंत्र" या विषयावर आयोजित केले होते!



- **जानेवारी २०२४:** अल्पारंभ एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशनने आयोजित केलेल्या इंटर्नशिप कार्यक्रमादरम्यान PHP- MySQL विषयावर ट्रेनिंग घेण्यात आले !! यात आठ उत्साही, सर्जनशील शिकण्याची आणि अंगीकारण्याची आवड असलेल्या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. ट्रेनर म्हणून डॉ. रुपाली कुलकर्णी यांनी काम केले.



- **१० डिसेम्बर २०२३ :** अल्पारंभा फाऊंडेशन चा ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म सुरु झाला. बऱ्याच महाविद्यालयीन विदयार्थ्यांना सॉफ्टवेअर्स शिकायची शिकण्याची जिद्द आणि इच्छा खूप असते पण इंग्रजी भाषेतून शिकण्याचा अडसर वाटतो. मोठ्या, प्रतिथयश ऑनलाईन कोर्स देणाऱ्या साईट्स वर इंगजी उच्चारण पद्धती समजत नाही !! आणि मग शिकण्याची इच्छा कोमेजून जाते. अशा विद्यार्थ्यांना डोळ्यासमोर ठेवून , त्यांच्यासाठी काम करण्याचे आम्ही ठरविले ! आणि त्यांची पहिली स्किल्स ची गरज लक्षात घेऊन मी MS EXCEL : मराठी हा ऑनलाईन कोर्स तयार केला ! लिंक पुढे देत आहे ! alparambha.com/learn/




- **२४ सप्टेंबर २०२३:** पहिला प्रयत्न ! चांगला प्रयत्न !! मानसिक आरोग्यासाठी "सेल्फ हेल्प टूलकिट" या विषयावर अतिशय आशयघन असे सत्र साक्षी देशमुख यांनी घेतले ! लहानांपासून मोठयांपर्यंत सर्व वयोगटातील सदस्यांनी यात सहभाग नोंदविला.



- **१५ ऑगस्ट २०२३:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून अल्पारंभा फाऊंडेशनच्या सौजन्याने लहान मुले व पालकांसाठी कार्यक्रम संपन्न झाला . श्री देवेन कापडणीस यांनी मुलांना सोप्या शब्दात, भारताचा पुरातन इतिहास समजावून सांगितला !! भारतीय स्वातंत्र्य इतिहासावर आधारित प्रश्नमंजुषे मध्ये, मुले आणि पालक सहभागी झाले.



- **१५ ऑगस्ट २०२३:** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आज श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालय नासिक येथे , अल्पारंभा फाऊंडेशनच्या माध्यमातून ५ गरजू विद्यार्थ्यांना हिअरिंग एड्स देण्यात आले. वर्ष २०१६- १७ पासून ते आजपर्यंत, एकुण ७० मुलांना हिअरिंग एड्स देण्यात आले आहेत. त्यांच्या शैक्षणिक प्रवासात खारीचा वाटा उचलणाऱ्या सर्व मदतकर्त्यांचे आभार !




- **ऑगस्ट २०२३:** अल्पारंभाच्या माध्यमातुन "कापरेकर गणित स्पर्धा परिक्षा"  या संदर्भात अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली आणि मार्गदर्शन करण्यात आले.  श्री. रघुवीर अधिकारी यांनी या हे सर्व सत्र विविध शाळांमध्ये घेतले ! सहभागी शाळा : पुरुषोत्तम इंग्लिश शाळा नासिक, जु. स. रुंग्टा हायस्कुल नासिक,  र. ज. चव्हाण बिटको शाळा , नाशिकरोड, शिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या पिंपळद ( मुंबई आग्रा रोड) येथील शाळा आदी.



- **२२ जुलै २०२३ :** "जागतिक पर्यावरण दिन २०२३" निमित्त अल्पारंभ आणि क्रिएटिव्हकोडर यांनी संयुक्तपणे *डिजिटल पोस्टर आणि "एनिमेशन स्पर्धा" आयोजित केली होती !! थायलंड, अमेरिका आणि भारतातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अप्रतिम क्रिएटिव्हज तयार केले होते !! या स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम २२ जुलै २०२३ रोजी झाला.



- **२१ एप्रिल २०२३:** टीम अल्पारंभाला "वित्तीय साक्षरता प्रमाणपत्र अभ्यासक्रम" ही कल्पना मांडण्याची संधी मिळाली ! यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नासिक येथे प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी अहवाल सादर करण्यात आला !



- **१३ एप्रिल ते १७ एप्रिल २०२३ :** पाच दिवसीय - कॅलिग्राफी वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले. यात २२ सदस्यांनी सहभाग नोंदविला. नाशिकच्या सुप्रसिद्ध  कॅलिग्राफी आर्टिस्ट सौ.  पूजा गायधनी यांनी सहभागी झालेल्या सदस्यांना देवनागरी कॅलिग्राफी चे प्रारंभिक धडे दिले !  अल्पारंभा फौंडेशन अंतर्गत सुरु असणाऱ्या विविध उपक्रमांना साहाय्य म्हणून याद्वारे निधी उभारण्यात आला.





- **२७ फेब्रुवारी २०२३ :  वाचाल तर अजूनही शिकाल** या पंक्तीस डोळ्यासमोर ठेवून कविवर्य कुसुमाग्रज  आणि नाशिकचेच लोकप्रिय लेखक कै. बा. ल. शुक्ल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून, मराठी वाचनाद्वारे सुसंस्कार आणि शिक्षणाची चळवळ सुरू रहावी यासाठी, **बा.ल. शुक्ल स्मृति : गप्पा आजोबांशी वाचन कट्टा** ही संकल्पना प्रत्यक्षात आली. समर्थ जॉगिंग ट्रॅक, आकाशवाणी येथे, सर्व मराठी वाचकांसाठी खुले

असणाऱ्या,विनामूल्य चालणाऱ्या वाचन कट्ट्याचे उदघाटन झाले. वाचकांसाठी दर्जेदार पुस्तके इथे उपलब्ध आहेत, जागतिक मराठी भाषा दिन, सोमवार २७ फेब्रुवारी २०२३ पासून हा वाचन कट्टा सुरु झाला.




- **२२ फेब्रुवारी २०२३ :** श्रीमती माई लेले श्रावण विकास विस्यालय नासिक येथे, वार्षिक कार्यक्रमादरम्यान, यथील तीन विद्यार्थ्यांना अल्पारंभातर्फे श्रवणयंत्र देण्यात आले. यामुळे त्यांच्या शिक्षणाचा मार्ग नक्कीच सुकर होण्यास मदत होईल .




- **२६ जानेवारी २०२३:** संस्थेने ई-यंत्रण: ई-कचरा संकलन मोहीम : प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०२३ मध्ये सहभाग नोंदविला !! या सामाजिक तसेच पर्यावरणपूरक मोहिमेचे उद्दिष्ट्य हे "नागरिकामध्ये इ -कचरा' हाताळण्याविषयी प्रबोधन, पर्यावरण संरक्षणाविषयी जागरूकता आणणे, ती वाढविणे आणि त्याच्या संरक्षणार्थ इलेक्ट्रॉनिक वेस्टचे योग्य पद्धतीने निर्मूलन करण्याची शिस्त बाणविणे" असा होता. जवळपास १०० किलो तांत्रिक कचरा यावेळी पूर्णम इकोव्हिजन पुणे , या संस्थेकडे जमा करण्यात आला. या सर्व ई-कचऱ्याचे पर्यावरणपूरक पद्धतीने पुनरुत्पादन, पुनर्निर्मितीसाठी प्रयत्न केला जाते.




- **५ डिसेम्बर २०२२:** नासिक येथील अल्पारंभा शैक्षणिक आणि साहित्यिक फाऊंडेशन तर्फे तसेच SWS फायनान्शियल सोल्युशन प्रा.लि. यांच्या माध्यमातून, महाराष्ट्र सेवा संघ समितीच्या , नासिक येथील श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालयातील, **कर्णबधीर व गरजू मुलांसाठी एकूण 14 श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले** . कर्णबधीर विद्यार्थ्यांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर मर्यादा असतात . त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत अडथळे निर्माण होतात. पालकांची आर्थिक परिस्थिती नाजुक असेल  तर काही वेळा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत खंड देखील पडतो आणि मुलांच्या मनात आधीच असलेली नैराश्याची भावना वाढीस लागते. या सर्वांचा विचार करून, या दोन्ही संस्थांच्या सहकार्याने **आतापर्यंत एकूण 60 श्रवणयंत्राची मदत करण्यात आली आहे.** यासाठी लोकसहभागातून पंधरा लाखाची मदत संस्थांतर्फे उभारण्यात आली. उपस्थित विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी आभार व्यक्त केले.





अल्पारंभातर्फे १४ कर्णबधिर मुलांना श्रवणयंत्रांचे वाटप

गरजू विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र वाटपप्रसगी संस्थेचे पदाधिकारी

प्रतिनिधी | नाशिक

अल्पारंभा शैक्षणिक आणि साहित्यिक फाउंडेशनर्फे तसेच एसडब्ल्यूएस फायनान्शियल सोल्युशन यांच्या माध्यमातून, महाराष्ट्र सेवा संघ समितीच्या माई लेले श्रवण विकास विद्यालयातील कर्णबधिर व गरजू मुलांसाठी १४ श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले .

कर्णबधीर विद्यार्थ्यांच्या ऐकण्याच्या क्षमतेवर मर्यादा असतात . त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत अडथळे निर्माण होतात. पालकांची आर्थिक परिस्थिती नाजूक असेल तर, काही वेळा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत खंड देखील पडतो आणि मुलांच्या मनात आधीच असलेली नैराश्याची भावना वाढीस लागते. याच भावनेतून ही मदत करण्यात आली आले. या दोन्ही संस्थेच्याव तीने मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेतला अजाते. या संस्थेच्या वतीने या सर्वांचा विचार करून, या दोन्ही संस्थांच्या सहकार्याने एकूण ६० श्रवणयंत्राची मदत करण्यात आली आहे. यासाठी लोकसहभागातून पंधरा लाखांची मदत संस्थांतर्फे उभारण्यात आली. या माध्यमातून समाजासमोर आदर्श निर्माण झाला असल्याचे आयोजकांनी सांगितले.

- **२९ सप्टेंबर २०२२:** अर्थ श्रीमती माई लेले श्रवण विकास विद्यालय येथील शिक्षकवृन्दासाठी **महिलांचे आरोग्य** - या विषयावर डॉ निलिमा राजगुरु एम. डी. आयुर्वेद यांचे व्याख्यान संपन्न झाले.





- **२८ सप्टेंबर २०२२: अर्थ साक्षरता आणि ब्लु बुक** याविषयांवर, अंकुर विद्यामंदिर यथील शिक्षकांबरोबर संवाद ! ब्लू बुक ही एक सोपी, सुलभ संकल्पना आहे जिचा वापर कुटुंबाशी संबंधित असणाऱ्या सर्व आर्थिक बाबींचे नोंदनीकरण करण्यासाठी होतो. असे केल्याने एखाद्या कुटुंबाची वास्तविक, आर्थिक परिस्थिती, घरातील सर्व सदस्यांना स्पष्ट होण्यास मदत होते तसेच कुटूंबाशी संबंधित भविष्यातील कोणत्याही आर्थिक निर्णयासाठी मार्गदर्शक म्हणूनही ब्लू-बुक कार्य करते.



- **२७ सप्टेंबर २०२२:** श्रीमती माई लेले श्रवणविकास विद्यालय, नासिक या शाळेस, श्री. संतोष दवे यांच्या सहकार्याने, **HP प्रिंटर आणि वॉटर प्युरिफायर** देण्यात आला. या त्यांच्या दातृत्वामुळे, शाळेची अनेक दिवसांची आवश्यकता

पूर्ण झाली आहे. महाराष्ट्रातील विविध संस्थांमध्ये जी दिव्यांग मुले शिक्षण घेत आहेत, जेथे अपुऱ्या शैक्षणिक सुविधांच्या अभावे विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात अडचणी आहेत, तेथे अल्पारंभा फाऊंडेशनद्वारे मदतीचा हात पुढे केला जातो आहे. अजून अशा अनेक गरजा भागविणे आवश्यक आहे. संस्थतर्फे दानशूर व्यक्तीना, पुढे यायचे आवाहन करित आहोत .



- **२६ सप्टेंबर २०२२:** आश्विन शुद्ध प्रतिपदा हा संत मुक्ताबाईंचा जन्मदिवस ! या निमित्ताने **'संत मुक्ताबाई आणि ताटीचे अभंग'** या विषयावर : श्री.अविनाश गोसावी यांचे, NAB संकुल, सातपूर येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले.



- **२३ सप्टेंबर २०२२:** संस्थेतर्फे नाशिकमधील, मराठी माध्यमाच्या शाळेतील, आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी एक उपक्रम हाती घेतलेला आहे. अलीकडच्या कोविड महामारीच्या प्रभावानंतर शिक्षणातील खंड टाळण्यासाठी तसेच शालेय स्तरावर आर्थिक आव्हानांमुळे होणारी विदयार्थ्यांची गळती कमी करण्यासाठी शाळा त्या विद्यार्थ्यांसाठी, **विद्यार्थ्यांचे निवास ते शाळा अशी वाहतुकीची व्यवस्था** करत आहे. निधी उभारण्यासाठी अल्पारंभातर्फे मोहीम राबविली जात असून, त्याद्वारे प्रथम मदतीचा धनादेश २३ सप्टेंम्बर २०२२ रोजी, शाळेच्या पदाधिकाऱ्यांना सुपूर्त करण्यात आला.

  एकूण उपक्रमासाठी अंदाजे खर्च ₹१४ लाख प्रति वर्ष असा आहे. तुमच्या इच्छेनुसार तुम्ही एका विद्यार्थ्याला ₹१,१०० वाहतूक खर्च दर महिना अथवा संपूर्ण वर्षाचे ₹१३,२०० असा खर्च उचलू शकता . आतापर्यंत असेही देणगीदार आहेत ज्यांनी एकदाच स्वेच्छेने, सोयीस्कर रक्कमेचे योगदान दिलेले आहे. तुमचे योगदान ( ₹५०१ पासून पुढे असणारे ) कलम ८० G अंतर्गत प्राप्तिकर लाभांसाठी पात्र आहे. आम्ही समाजातील सधन नागरिकांना या कार्यासाठी पुढे येण्याचे आवाहन करीत आहोत.



- **१३ सप्टेंबर २०२२:** श्री ज्ञानराज माऊलींचे पसायदान आपण अनेकवेळा म्हणतो. या अलौकिक प्रार्थनेचा अर्थ नितांत सुंदर आहे. या भाव-अर्थाचे चिंतन-मनन घडावे, जीवनात त्याचा उपयोग व्हावा म्हणून संस्थेतर्फे व म .स. से. संघ संचलित नवरचना विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी **"पसायदान एक चिंतन."** विषयावर, श्री. अविनाश प. गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.






- **ऑगस्ट २०२२:** आजादीका अमृत महोत्सव' या निमित्ताने नाशिक येथील चार शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी , **"शुरा मी वंदीले"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध, आकाशवाणी निवेदिका व सामाजिक व्याख्यात्या " अनघाताई मोडक" मुंबई, यांनी स्वातंत्र्य सेनानींच्या गौरवार्थ व्याख्यान दिले !





- **जुलै -ऑगस्ट २०२२:**नाशिकमधील, मराठी माध्यमाच्या शाळेतील, आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी तसेच कोविड महामारीच्या प्रभावानंतर शिक्षणातील खंड टाळण्यासाठी, शाळा त्या विद्यार्थ्यांसाठी, **विद्यार्थ्यांचे निवास ते शाळा अशी वाहतुकीची व्यवस्था** करत आहे.




- **जुलै -ऑगस्ट २०२०:**कोविड १९ च्या देशभरातील लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये, लहान मुलांना कृतिशीलपणे रमविणे, हे पालकांपुढे आव्हान होते. या कालावधीत मराठी भाषा शिक्षणाचा एक प्रयोग प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या पाल्यांसाठी फौंडेशनच्या माध्यमातून केला.आणि "कविता" हे मुलांच्या आवडीचे माध्यम निवडले. सुंदर ताल, नाद, ठेका असणाऱ्या कविता मुले सहजपणे गुणगुणायला लागतात, त्यातील शब्दांचा अन्वयार्थ लावण्यात सुरुवात करतात हा अनुभव पाठीशी होताच. तेव्हा, मुलांसमोर हा बालसाहित्याचा अमूल्य ठेवा उलगडण्यासाठी आम्ही एक ऑनलाईन उपक्रम घेण्याचे ठरविले आणि **"कविता मनातल्या"** या कार्यक्रमाचे आयोजन केले! या कार्यक्रमाचा युट्युब प्रीमिअर घेण्यात आला होता. त्याची लिंक पुढीलप्रमाणे :कविता मनातल्या येथे पहा तसेच देशभक्तीपर गीतांवर आधारित 'मिले सूर मेरा तुम्हारा ' याही ऑनलाईन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची लिंक पुढीलप्रमाणे :मिले सूर मेरा तुम्हारा येथे पहा या अशा कार्यक्रमाच्या माध्यमातुन आम्ही पुढील हेतू साध्य करण्यास सफल ठरलो.

१) कवितांच्या माध्यमातून मुलांचा शब्दसंग्रह वाढविणे,

२) विविध भावना व्यक्त करणेसाठी कवितेच्या माध्यमाचा उपयोग,

३) मराठीतील संपन्न बालसाहित्याची ओळख,

४) प्रभावी सादरीकरण पद्धती,

५) मुलांच्या कल्पकतेला चालना इ.







- **२०१८ पासून आजतागायत:** बालदोस्तांसाठी विविध उपक्रम संस्थेमार्फत नियमितपणे घेतले जातात. यात **'मुक्तरंग'** हे हस्तकला शिबीर, **'वयम वाचक कट्टा'** हा वाचनाची आवड रुजविण्यासाठी उपक्रम तसेच **'बायोस्कोप'** हा बालचित्रपटांचा खजिना उलगडणारा उप्रक्रम यांचा समावेश असतो. कला, दर्जेदार साहित्य यांचा प्रसार आणि त्यायोगे बालमानांचे शिक्षण हा प्रमुख हेतू या उपक्रमांमागे असतो.



- **२०१८ पासून आजतागायत:** नासिक येथील श्रीमती माई लेले श्रावण विकास विद्यालयातील विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र उपलब्ध व्हावे यासाठी संस्थे तर्फे, समाजातील अनेक दानशूर व्यक्तींच्या साहाय्याने रु. १५ लाख इतका निधी उभारण्यात आला आहे. त्याचा धनादेश स्वीकारतांना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वृषाली घारपुरे. अल्पारंभाच्या माध्यमातून या संस्थेच्या अनेक होतकरू, हुशार विद्यार्थ्यांना भविष्यातही अशा स्वरूपाची मदत उपलब्ध व्हावी म्हणून संस्था प्रयत्नशील आहे.






**२०१८ पासून आजतागायत**: पिंपळगाव बाहुला, नासिकस्थित घरकुल परिवार संस्था मानसिकदृष्ट्या अपंग असलेल्या मुली / स्त्रियांसाठी (खासकरुन ज्यांच्या पालकांना या सुविधा उपलब्ध करुन देण्यात अक्षम आहेत) त्यांना सुरक्षित घर उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापना केली गेली आहे. सौ. विद्याताई फडके यांच्या मार्गदर्शनाखाली, या विशेष मुलींच्या पुनर्वसनासाठी संस्था काम करते. संस्थेतर्फे, घरकुल येथील मुलींच्या सहाय्यतेसाठी निधी उभारण्यात येतो. दिवाळी, गणेशोत्सव काळात या मुलीने तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठीही संस्थेतर्फे सहाय्य करण्यात येते. आर्थिक मदतीचा धनादेश स्वीकारतांना सौ. विद्याताई फडके.






• **२०१८ पासून आजतागायत:** जनकल्याण सेवा समितीसाठी, संस्थेतर्फे नेहेमीच मदतीचा हात असतो . नासिकच्या आसपासच्या विविध तालुक्यातील आश्रम शाळेतील मुलांना शालेय साहित्याचे वाटप, मुक्तांगण द्वारे प्रकाशित केली जाणाऱ्या मराठी साहित्याचे वाटप शिवाय त्यांच्या दहावीतील मुलांच्या परिक्षापूर्व अभ्यासवर्गास मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांमार्फत संस्था आणि जनकल्याण सेवा समितीचे नाते नेहेमीच दृढ होत गेले आहे.



